आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

२३ ऑगस्ट २०२५ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- गगनयान मोहिमेसाठी आवश्यक असलेलं तंत्रज्ञान, भारत वेगाने विकसित करत असून लवकरच गगनयान अंतराळात झेपावेल, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- राज्यातल्या आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी राज्यभरातल्या महानगरपालिका, जिल्हा परिषदांची प्रारूप प्रभाग रचना जाहीर

- स्टेट बँक कर्ज फसवणूक प्रकरणी अनिल अंबानी यांच्याशी संबंधित आस्थापनांवर सीबीआयचे छापे

- नागपुरातील परंपरागत बडगा  मारबत उत्साहात

**आणि**

- कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचे कुलगुरु, प्राध्यापक हरेराम त्रिपाठी यांचा अपघाती मृत्यू

**<><><><><>**

गगनयान मोहिमेसाठी आवश्यक असलेलं तंत्रज्ञान, भारत वेगाने विकसित करत असून लवकरच गगनयान अंतराळात झेपावेल, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. दुसऱ्या राष्ट्रीय अंतराळ दिनाच्या निमित्ताने त्यांनी देशाला संबोधित केलं. गेल्या काही काळांत अंतराळ क्षेत्रात भारतानं केलेल्या कामगिरीचा गौरवपूर्ण उल्लेख आणि भविष्यातल्या मोहिमांचा सूतोवाच करताना ते म्हणाले,

***होल्ड... बाइट- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी  (३० सेकंद)***

‘आर्यभट्ट ते गगनयान’ ही या वर्षीच्या अंतराळ दिवसाची मध्यवर्ती संकल्पना असून यात भूतकाळाचा आत्मविश्वास आणि भविष्याचा संकल्प आहे, असं ते म्हणाले.

अंतराळ तंत्रज्ञान क्षेत्रातल्या देशाच्या प्रगतीमुळे सामान्य नागरिकांच्या जीवनात अमूलाग्र बदल घडत असून कृषी, मासेमारी, आपत्ती व्यवस्थापन, कनेक्टिव्हिटी इत्यादी क्षेत्रांमध्ये हे क्षेत्र मोठं योगदान देत आहे, असं प्रधानमंत्री यावेळी म्हणाले. गेल्या ११ वर्षांत अंतराळ क्षेत्रात केलेल्या विविध सुधारणांची माहिती त्यांनी दिली. या क्षेत्राची दारं खासगी क्षेत्रासाठी उघडल्यामुळे सध्या ३५० स्टार्टअप्स या क्षेत्रात काम करत आहेत, असं मोदी यांनी सांगितलं. पुढच्या ५ वर्षांत अंतराळ क्षेत्रातले ५ युनिकॉर्न उभारायचं आणि प्रत्येक वर्षी ५० रॉकेट्सचं प्रक्षेपण करायचं ध्येय ठेवावं, असं त्यांनी सुचवलं. त्यासाठी या क्षेत्रात अत्याधुनिक सुधारणांची गरज असून त्या करायचा सरकारचा उद्देश आणि इच्छाशक्ती आहे, अशी ग्वाही प्रधानमंत्र्यांनी दिली.

**<><><><><>**

चांद्रयान २ मोहिमेतून मिळालेल्या माहितीच्या आधारे आयआयटी मुंबईतल्या विद्यार्थ्यांनी चंद्राच्या पृष्ठभागावर उपलब्ध असलेल्या रसायनांचे नकाशे तयार केले आहेत. इस्रोच्या मदतीनं देशभरातल्या आयआयटींनी आयोजित केलेल्या स्पर्धेत आयआयटी मुंबईच्या विद्यार्थ्यांनी पहिलं स्थान पटकावलं. स्पर्धेत मिळालेल्या यशावर न थांबता या विद्यार्थ्यांनी यावर आणखी विस्तृत संशोधन केलं, ज्याचा उपयोग भविष्यातल्या चांद्र मोहिमांसाठी होणार आहे. याविषयी अधिक जाणून घेऊया त्यांचे प्राध्यापक वरुण भालेराव यांच्याकडून.

***होल्ड... बाइट- वरूण भालेराव (२६ सेकंद)***

विद्यार्थ्यांनी केलेलं हे संशोधन प्लानेटरी सायन्स जर्नलमध्ये प्रकाशित होण्याची प्रक्रिया सुरू आहे. हे नकाशे आणि इतर माहिती आयआयटी मुंबईच्या वेबसाइटवर चांद्रयान नावानं उपलब्ध आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी महानगरपालिकांची प्रारूप प्रभाग रचना काल जाहीर झाली. २९ महानगरपालिकांसाठी प्रभाग निश्चित करण्यात आले आहेत.

अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून……

**होल्ड… व्हीसी (१.२९ सेकंद)**

*बृहन्मुंबई महानगरपालिकेत यात निवडणुकीसाठी २२७ प्रभाग असतील. नवी मुंबई महानगरपालिकेत २८ प्रभाग असून यात २७ प्रभाग चार सदस्यीय असून एक प्रभाग तीन सदस्यीय आहे, यातून १११ सदस्य निवडले जाणार आहेत. नागपूर मधे एकूण ३८ प्रभाग असतील. यात चार सदस्यीय प्रभाग ३७ तर एक प्रभाग तीन सदस्यीय असेल. नागपूर महानगरपालिकेत १५१ नगरसेवक निवडले जाणार आहेत. नाशिक महानगरपालिकेची प्रारुप प्रभाग रचना जाहीर झाली आहे. येत्या महानगरपालिका निवडणुकीसाठी नाशिकमधे ३१ प्रभाग असणार आहेत. यात २९ प्रभाग चार सदस्यीय असून २ प्रभाग तीन सदस्यीय आहेत. यातून एकूण १२२ सदस्य निवडले जाणार आहेत. छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेत २९ प्रभागांतून ११५ सदस्य निवडले जातील. पुणे महानगरपालिकेत ४० प्रभाग चार सदस्यीय आणि एका पाच सदस्यीय प्रभागासह ४१ प्रभाग निश्चित केले आहेत. यातून १६५ सदस्य निवडले जाणार आहेत. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतल्या ३२ प्रभागामधल्या १२८ सदस्यासाठी निवडणूक होईल. तर कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतल्या ३१ प्रभागातून १२२ नगरसेवक निवडले जातील.*

*नाशिक जिल्हा परिषद गट आणि पंचायत समिती गणांची पुनर्रचना करण्यात आली आहे. यानुसार एक गट वाढला असून आता एकूण ७४ गट असतील. तर गणांची संख्याही दोनने वाढून ती १४८ इतकी झाली आहे. बीड, परभणी तसंच इतर जिल्हा परिषदांसाठीही प्रभाग रचना काल जाहीर झाली.*
*या प्रारुपावर ४ सप्टेंबरपर्यंत हरकीत आणि सूचना पाठवता येतील.*

**<><><><><>**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून राज्यातल्या महिला स्वावलंबनाचे नवे मार्ग शोधत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. राज्यातल्या महिलांनी मुख्यमंत्र्यांसाठी रक्षाबंधनानिमित्त राख्या पाठवल्या, त्यानिमित्त मुंबईत कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते.

**<><><><><>**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज फारोळा इथल्या जलशुद्धीकरण केंद्राचं जलपूजन केलं. छत्रपती संभाजीनगर शहराच्या पाणीपुरवठा प्रकल्पांतर्गत ९०० मिलिमीटर व्यासाटी जलवाहिनी आणि २६ दशलक्ष लीटर क्षमतेचं हे जलशुद्धीकरण केंद्र आहे.

त्याचप्रमाणे छत्रपती संभाजीनगर शहरासाठी सध्याची पाणीपुरवठा योजना अतिशय अपुरी पडत असल्यामुळं महानगरपालिकेनं वाढीव योजनेचा प्रस्ताव शासनाला सादर केला आहे.

**<><><><><>**

सीबीआयनं आज मुंबईत अनिल अंबानी आणि रिलायन्स कम्युनिकेशनच्या कार्यालयावर छापे टाकले. स्टेट बँकेकडून कर्ज घेतलेल्या सुमारे २ हजार ९०० कोटी रुपयांच्या कर्जाप्रकरणी मुंबईत हे छापे पडले. १३ जून रोजी स्टेट बँकेनं रिलायन्स कम्युनिकेशनला दिलेलं कर्ज 'फसवणूक' या श्रेणीत वर्ग केलं होतं. कर्जाच्या रकमेचा गैरवापर केल्याचा बँकेचा दावा आहे.

१७ हजार कोटींच्या कर्ज घोटाळा प्रकरणी काही दिवसांपूर्वी ईडीनं अनिल अंबानी यांचं कार्यालय आणि इतर ठिकाणी छापे टाकून काही वस्तू जप्त केल्या होत्या, तसंच त्यांची चौकशी केली होती.

**<><><><><>**

नागपूरचा ऐतिहासिक वारसा असलेली काळी-पिवळी मारबत बडगा मिरवणूक आज जागनाथ बुधवारी इतवारी परिसरातून काढण्यात आली. या मिरवणुकीत, इडापिडा, रोगराई घेऊन जा गे मारबत अशा घोषणा करत समाजाच्या ज्वलंत मुद्द्यांकडे प्रशासनाचं लक्ष वेधण्यात आलं. मिरवणूक बघण्यासाठी नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

बैलपोळ्याच्या दुसऱ्या दिवशी भरणाऱ्या तान्हा पोळा सणाचा उत्साह आज नागपुरात अनेक ठिकाणी दिसून आला. लहान मुलांनी लाकडी बैलाचा पोळा

साजरा केला. आंब्याचं तोरण लावून त्याला जिलेबी, फळं, चॉकलेट, बिस्किटांचे पुडे अशा विविध वस्तूंनी तयार केलेलं तोरण बांधून त्यात मुलांना उभं करून लाकडी बैलांची पूजा करण्यात आली आणि पूजा संपल्यावर तोरण तोडून पोळा फोडून मुलांना पैसे, खाऊ वाटण्यात आला.

**<><><><><>**

कविकुलगुरू कालिदास संस्कृत विश्वविद्यालयाचे कुलगुरु प्राध्यापक हरेराम त्रिपाठी आणि त्यांच्या पत्नीचा आज पहाटे रस्ते अपघातात मृत्यू झाला. उत्तर प्रदेशमधल्या कुशीनगरजवळ हा अपघात झाला. प्राध्यापक हरेराम त्रिपाठी हे भारतीय तत्वज्ञानाचे , न्यायशास्त्राचे प्रख्यात विद्वान आणि तत्त्वज्ञ होते. राज्यपाल आणि कुलपती सी. पी. राधाकृष्णन यांनी त्यांच्या निधनाबद्दल  तीव्र दुःख व्यक्त केलं आहे. संस्कृत भाषेसाठी निष्ठेनं झटणारा एक संशोधक, अभ्यासक आणि उत्तम प्रशासक गमावला आहे, असं त्यांनी आपल्या शोकसंदेशात म्हटलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही प्राध्यापक हरेराम त्रिपाठी यांना श्रद्धांजली वाहिली. तसंच केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनीही त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसांत कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्रात आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी, तर विदर्भात बऱ्याच ठिकाणी पाऊस पडेल, असा अंदाज आहे. या काळात कोकणात आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पावसाची शक्यता असून, किनारपट्टी भागात सोसाट्याचा वारा वाहील, असा पुणे वेधशाळेचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**